## पुणे महानगरपालिका, समाज विकास विभाग
## स्पर्धा परीक्षा (UPSC/MPSC तसेच इतर स्पर्धा परीक्षा) मार्गदर्शन प्रशिक्षण

पुणे महानगरपालिका, समाज विकास विभाग व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र यांचे संयुक्त सहकार्याने पुणे मनपा हद्दितील १०० मागासवर्गीय व खुल्या गटातील ५० विद्यार्थ्यांकरीता स्पर्धा परीक्षा (UPSC/MPSC तसेच इतर स्पर्धा परीक्षा) मार्गदर्शन प्रशिक्षण प्रकल्प विनामुल्य स्वरूपात आयोजित करणेत येत आहे. याबाबत **sdd.punecorporation.org** या संकेतस्थळावरती दि.१७/०६/२०१९ ते दि.१५/०७/२०१९ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविणेत आले होते. तथापी या जाहिरातीस अनुसरून कमी विद्यार्थ्यांनी अर्ज केल्याने दि. ३१/७/२०१९ पर्यंत मुदतवाढ देणेत येत आहे.

**sdd.punecorporation.org** या संकेतस्थळावर नमूद केलेल्या नियम व अटी नुसार आवश्यक कागदपत्र स्कॅन करून अर्ज भरणेत यावा. सदर योजने विषयीची सविस्तर माहिती संकेतस्थळावरती उपलब्ध करणेत आली आहे (अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्विकारणेत येतील. अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर भरलेल्या अर्जाची प्रिंट काढून त्या सोबत कागदपत्रे व दोन पासपोर्ट साईज फोटो जोडून अर्ज न. वि. गाडगीळ प्रशाला, शनिवार पेठ, दक्षिणमुखी मारूती मंदिराजवळ, पुणे ३० येथे दि. ३१/०७/२०१९ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावा.)

**अधिक माहितीकरीता संपर्क –** श्रीमती मंजुषा कणकुरीकर, सहा.समाज विकास अधिकारी,
समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका,
मुख्य इमारत, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५
संपर्क क्र. ९६८९९३१४८४

(सुनिल इंदलकर)
उप आयुक्त
स.वि.वि., पुणे म.न.पा

D:\2017\Asang patil sir\Sapradha pariksha 2018-19\Spardha Pariksha -shedul 2019-2020 .doc

**टिप –** Register Here या बटणावरती क्लिक केल्यानंतर **स्पर्धा परीक्षा** (MPSC/UPSC तसेच इतर स्पर्धा परीक्षा) अर्ज भरण्यास सुरूवात होईल.

- **स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण MPSC/UPSC तसेच इतर स्पर्धा परीक्षा वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.**
  १. विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज स्विकारणे – दि.३१/०७/२०१९ पर्यंत
  २. निवड प्रवेश परीक्षा – दिनांक ०४/०८/२०१९ रोजी सकाळी १०.०० ते दु. १.०० या वेळेत घेणेत येईल. परीक्षेचे ठिकाण– स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ. निवड प्रवेश परीक्षाकरीता आधार कार्ड मूळ प्रत आणणे आवश्यक आहे.
  ३. मुलाखतीला पात्र विद्यार्थ्यांची यादी दि. ०७/०८/२०१९ रोजी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे उपलब्ध होईल.
  ४. युपीएससी व एमपीएससी पात्र विद्यार्थ्यांच्या मुलाखती दि. ०९/०८/२०१९ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण केंद्राचे ठिकाणी घेण्यात येईल.
  ५. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण केंद्राचे ठिकाणी प्रशिक्षणार्थी निवड प्रवेश परीक्षा निकाल पहावयास दि. १६/८/२०१९ रोजी उपलब्ध राहील.
  ६. स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण निवड प्रवेश परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांनी अनामत र.रू. १०००/– पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागकडे दि.१९/८/२०१९ ते दि.२४/८/२०१९ या कालावधीत चलनाने जमा करणे आहे. (अनामत रक्कम जमा करणे चलन पावती न.वि.गाडगीळ प्रशाला,शनिवार पेठ, पुणे –३० या ठिकाणी उपलब्ध राहील)
  ७. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण केंद्राचे ठिकाणी MPSC/UPSC तसेच इतर स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण वर्ग दि.२६/८/२०१९ पासून दु. १२.०० वा. सुरू करणेत येणार आहेत.
- **स्पर्धा परीक्षा MPSC/UPSC तसेच इतर स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण –वरील प्रमाणे वेळापत्रकात बदल करणेत आलेस याबाबत sdd.punecorporation.org या संकेतस्थळावरती त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करणेत येईल.**

## पुणे मनपा हद्दितील मागासवर्गीय व खुल्या गटातील विद्यार्थ्यांकरीता विनामुल्य स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण विद्यार्थी प्रवेश करीता नियम व अटी

१. मागासवर्गीय (SC/ST/NT) व खुल्या गटातील विद्यार्थांकरिता सदर योजना आहे.

२. कुटुंबाचे पुणे महानगरपालिका हद्दीत किमान ३ वर्षे वास्तव्य असल्याचा दाखला (रेशनिंग कार्डची साक्षांकित प्रत आवश्यक) तसेच ३ वर्षे वास्तव्य असलेल्या राहण्याचा पुरावा म्हणून गत ३ वर्षाचा मनपा टॅक्स पावती किंवा लाईट बिल किंवा टेलिफोन बिल (लॅण्डलाईन) किंवा झोपडी फोटो पास/झोपडी सेवा शुल्क पावती/भाडे करारनामा इ. जोडावे.

३. शैक्षणिक पात्रता- पदवी/पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण आवश्यक. (प्रमाणपत्र व गुणपत्रक सोबत जोडणे आवश्यक.)

४. वय मर्यादा- MPSC / UPSC करीता वय मर्यादा खालील तक्यात दर्शविणेत येत आहे.

| i. Category | MPSC | UPSC |
|---|---|---|
| ii. SC | ४३ | ३७ |
| iii. ST | ४३ | ३७ |
| iv. NT | ३८ | ३५ |
| v. Open | ३८ | ३२ |

b. **(वयाच्या पुराव्यासाठी जन्म दाखला/ ससून हॉस्पिटल येथील वयाबाबतचा दाखला, शाळेचा दाखला, शैक्षणिक पात्रतेचा दाखला इ. एक आवश्यक)**

५. स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय (SC/ST/NT) गटातील व खुल्या गटातील विद्यार्थ्यांना कुटुंबाचे सर्व मार्गाने मिळणारे उत्पन्न मर्यादा करीताची अट राहणार नाही.

६. जातीचा दाखला- विद्यार्थी मागासवर्गीय (SC/ST/NT) असल्यास जातीचा दाखला अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

७. सर्व कागदपत्रे ही साक्षांकित करूनच अर्जासोबत जोडावी.

८. दिनांक ०१/०५/२००१ नंतर जन्माला आलेल्या व हयात अपत्यांमुळे कुटुंबाच्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा जास्त झाल्यास योजनेचा लाभ मिळणार नाही.

९. प्रवेश घेते वेळेस अनामत रक्कम रू. १०००/- चलनाने पुणे मनपाकडे जमा करावी लागेल व प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर सदरची रक्कम अदा केली जाईल.

१०. प्रशिक्षणकरीता प्रवेश घेते वेळेस उपरोक्त अटी विषयक सर्व मूळ कागदपत्रे दाखविणे बंधनकारक राहील.

११. **प्रशिक्षणकरीता निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी अनामत रक्कम पुणे महानगरपालिकाकडे जमा करतेवेळेस ऑनलाईन अर्जाचे प्रिन्ट सह (सर्व कागदपत्रे ही साक्षांकित करणेत येवून ) अर्जासोबत जोडावीत व अर्ज न.वि. गाडगीळ प्रशाला, शनिवार पेठ,पुणे -३० येथे जमा करावा.**

१२. स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कालावधी एक वर्षाचा असणार आहे.

१३. अर्ज स्विकारण्याचा/नाकारण्याचा अधिकार मा. उप आयुक्त, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका यांच्याकडे राहील.

(सुनिल इंदलकर)
उप आयुक्त
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

D:\2017\Asang patil sir\Sapradha pariksha 2018-19\Spardha Pariksha -shedul 2019-2020 .doc